# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date 16 October 2026
## Time 7.10 to 7.20 AM
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक १६ ऑक्टोबर २०२६ सकाळी ७.१० मि.

****

- वर्षभरातल्या सर्व सण–उत्सवांदरम्यान सार्वजनिक रस्ते, गल्ल्या आणि पदपथांवर फटाके वाजवण्यावर मुंबई उच्च न्यायालयाची बंदी
- धर्मांतर करणाऱ्या व्यक्तींना मागासवर्गीय प्रवर्गाअंतर्गत आरक्षणाच्या लाभांवर दावा करता येणार नाही, सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय
- साखरेची साठेबाजी रोखून पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी केंद्र सरकारकडून नियमांमध्ये सुधारणा
- राज्य सरकारची सुट्या मसाल्यांच्या विक्रीवर बंदी

आणि

- दिवाळीनिमित्त घेतलेला हंगामी १५ टक्के भाडेवाढीचा निर्णय एसटी महामंडळाकडून रद्द

****

नवरात्र, दिवाळी आणि ख्रिसमस यासह वर्षभरातल्या सर्व सण–उत्सवांदरम्यान सार्वजनिक रस्ते, गल्ल्या आणि पदपथांवर फटाके वाजवण्यावर मुंबई उच्च न्यायालयानं पूर्णत: बंदी घातली आहे. न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या पीठानं काल हा निर्णय दिला. फटाक्यांच्या प्रदूषणामुळे जनतेला विशेषतः ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना प्रचंड त्रास होतो, असं निरीक्षण न्यायालयानं नोंदवलं. फटाक्यांचं उत्पादन किंवा विक्रीवर बंदी घातलेली नाही, असंही न्यायालयानं स्पष्ट केलं.

****

हिंदू धर्मातून इतर कोणत्याही धर्मात, धर्मांतर करणाऱ्या व्यक्तींना मागासवर्गीय प्रवर्गा अंतर्गत आरक्षणाच्या लाभांवर दावा करता येणार नाही, असं सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे. मद्रास उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात तामिळनाडू सरकारने दाखल केलेली याचिका फेटाळून लावताना, न्यायमूर्ती प्रशांत कुमार मिश्रा आणि न्यायमूर्ती चंद्रशेखर यांच्या पीठानं हा निर्णय दिला. धर्मांतरापूर्वी अनुभवलेला सामाजिक मागासलेपणा धर्मांतरानंतरही कायम राहत नाही, तसंच हिंदू, शीख किंवा बौद्ध धर्माव्यतिरिक्त इतर कोणताही धर्म पाळणारी व्यक्ती अनुसूचित जातीचा दर्जा गमावते, असं न्यायालयानं नमूद केलं.

****

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेतल्या कथित अनियमिततेच्या विरोधात विरोधी पक्षांनी सर्वोच्च न्यायालयावर काढलेल्या मोर्चाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयानं काँग्रेस नेते राहुल गांधी, समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांच्यासह इतरांना नोटीस बजावली आहे. सर्वोच्च न्यायालयाला धाक दाखवून कुणीही कोणतीही गोष्ट करवून घेऊ शकत नाही, असं न्यायालयानं स्पष्ट केलं.

दरम्यान, एसआयआर प्रक्रियेतल्या अनियमितता आणि मोठ्या प्रमाणावर मतदारांची नावं यादीतून वगळल्यासंदर्भात दाखल याचिकांवर, न्यायालयानं निवडणूक आयोगाकडून उत्तर मागवलं आहेत. जंतरमंतरचं नाव अधिकृत आंदोलनस्थळांच्या यादीतून काढून टाकायच्या निर्णयाला आव्हान देणारी याचिकाही न्यायालयानं स्वीकारली.

****

सणासुदीच्या काळात साखरेची साठेबाजी रोखण्यासाठी आणि साखरेचा पुरवठा सुरळीत राहावा, यासाठी सरकारने साठाविषयक नियमांमध्ये सुधारणा केली आहे. आता साखर व्यापाऱ्यांना फक्त १५ दिवसांपर्यंतच साखर साठवून ठेवता येईल. वितरकांसाठी साखरेचा साठा ठेवण्याची मर्यादाही एक हजार क्विंटल निश्चित करण्यात आली आहे. कालपासून लागू झालेले हे नियम येत्या ३० नोव्हेंबरपर्यंत लागू राहतील, असं ग्राहक व्यवहार मंत्रालयाकडून सांगण्यात आलं आहे.

****

राज्य सरकारनं सुट्या मसाल्यांच्या विक्रीवर बंदी घातली आहे. अन्न आणि औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत ही घोषणा केली.

मसाल्यांच्या पाकिटावर उत्पादनाचं नाव, त्यातले घटक पदार्थ, उत्पादकाचा तपशील, उत्पादनाची आणि पॅकेजिंगची तारीख, एक्सपायरी डेट असे सर्व तपशील ठळकपणे नमूद करणं बंधनकारक आहे. मसाल्यांची शुद्धता, सेंद्रीयता, नैसर्गिकता आणि आरोग्याच्या लाभांविषयी पुरावे नसताना दावे करणाऱ्यांवर नियमाप्रमाणे कारवाई केली जाईल, असंही मुंढे यांनी सांगितलं. सार्वजनिक रस्ते, डांबरी पृष्ठभाग, गटारं, कचराकुंड्या किंवा जनावरांच्या गोठ्याजवळ मसाले वाळवता येणार नाहीत, मसाल्यांबरोबर रसायनं, कीटकनाशकं, औद्योगिक रंग किंवा इतर हानीकारक पदार्थ साठवायला मनाई असल्याचंही मुंढे यांनी सांगितलं आहे.

****

राज्य मार्ग परिवहन  – एसटी महामंडळाने दिवाळी निमित्त घेतलेला हंगामी १५ टक्के भाडेवाढीचा निर्णय रद्द केला आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या जनतेवर आणखी भार टाकणं योग्य नसल्याची भूमिका घेत महामंडळाचे अध्यक्ष तथा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी याबाबतचा प्रस्ताव फेटाळून लावल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

वीज महावितरण कंपनीला देशातील भविष्यवेधी डिस्कॉम या मुख्य श्रेणीमध्ये राष्ट्रीयस्तरावर प्रथम क्रमांक मिळाला आहे. महावितरणने यासह तब्बल सात पुरस्कार पटकावले. दिल्ली इथं झालेल्या २० व्या राष्ट्रीय ऊर्जा परिषदेमध्ये महावितरणचे संचालक धनंजय औंढेकर यांनी हे पुरस्कार स्वीकारले.

****

SIR मधून वगळल्या गेलेल्या मतदारांसाठी केंद्रीय निवडणूक आयोग १७ आणि १८ ऑक्टोबर, तसंच २४ आणि २५ ऑक्टोबर रोजी राज्यभरातल्या सर्व मतदान केंद्रांवर विशेष शिबिर घेणार आहे. BLO या ठिकाणी उपस्थित असतील अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी दिली आहे.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनाचा २५ वर्षांचा प्रवास ‘जनसेवा से देशसेवा’ या मंत्राने प्रेरित असून, सेवा आणि सुशासनाच्या दृष्टिकोनातून २०४७ पर्यंत विकसित भारताचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सरकार कार्यरत आहे. सामाजिक सक्षमीकरणाच्या माध्यमातून नागरिकांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तनाचा प्रयत्न

या कार्यातून होत आहे. 'गव्हर्नमेंट ई–मार्केटप्लेस' अर्थात GeM पोर्टल हा देखील याच प्रयत्नांचा भाग आहे. आज या पोर्टलविषयी जाणून घेऊ,

**सरकारी खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता, कार्यक्षमता आणि स्पर्धात्मकता वाढविण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने ९ ऑगस्ट २०१६ रोजी 'गव्हर्नमेंट ई–मार्केटप्लेस' अर्थात GeM पोर्टल सुरू केले. केंद्रीय व राज्य सरकारी विभाग, सार्वजनिक उपक्रम आणि विविध शासकीय संस्थांना आवश्यक वस्तू व सेवांची ऑनलाइन खरेदी करता यावी, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. यामुळं सरकारी खरेदीसाठी प्रामुख्याने पारंपरिक निविदा प्रक्रिया अधिक सुलभ झाली आहे. या पोर्टलच्या माध्यमातून खरेदीदार आणि विक्रेते यांना एकाच ऑनलाइन मंचावर व्यवहार करता येतात.**

**बाईट – पंतप्रधान नरेंद्र मोदी**

**या पोर्टलमुळे सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांना तसंच इतर पात्र विक्रेत्यांना सरकारी खरेदीदारांपर्यंत थेट पोहोचण्याची संधी उपलब्ध झाली आहे. कागदविरहित, रोखविरहित आणि संपर्कविरहित व्यवहारांवर भर देणाऱ्या या व्यवस्थेमुळं प्रशासकीय खर्च कमी करण्यास आणि खरेदी प्रक्रियेची कार्यक्षमता वाढविण्यास मदत झाली आहे.**

****

दिवंगत राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन काल साजरा झाला. छत्रपती संभाजीनगर इथं जिल्हाधिकारी कार्यालय तसंच महापालिकेसह विविध शासकीय, शैक्षणिक आणि सामाजिक संस्थांच्या वतीने कलाम यांना अभिवादन करण्यात आलं. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांनी कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. विद्यापीठाच्या ज्ञानस्रोत केंद्रात दुर्मिळ ग्रंथांचं तीन दिवसीय प्रदर्शनही भरवण्यात आलं आहे.

****

लातूर दौऱ्यावर असलेल्या महिला आणि बालविकास राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी काल स्त्री रुग्णालयाला अचानक भेट देऊन पाहणी केली. रुग्णालयात स्वच्छतेचा अभाव आणि रात्रीच्या वेळी रुग्णांना बाहेर रेफर केलं जात असल्याच्या

तक्रारींची त्यांनी गंभीर दखल घेतली. याप्रकरणी त्यांनी वैद्यकीय अधीक्षकांना रुग्णालयाच्या कारभारात तातडीने सुधारणा करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

****

'सेवा संकल्प अभियाना'अंतर्गत काल लातूर इथं राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत मेळावा घेण्यात आला. महिलांच्या सक्षमीकरणासाठी केंद्र आणि राज्य शासनाकडून राबवण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना, स्वावलंबनाच्या संधी आणि महिलांचे हक्क याबाबत यावेळी मार्गदर्शन करण्यात आलं.

**

छत्रपती संभाजीनगर इथं सेवा संकल्प अभियानांतर्गत काल 'मिशन रेबीज'तर्फे बहुउद्देशीय आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी विशेष कार्यशाळा घेण्यात आली. 'रेबीज आजार : लक्षणे, उपचार आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना' या विषयावर केंद्राचे प्राचार्य डॉ. संतोष कडले यांनी मार्गदर्शन केलं.

****

हिंगोली जिल्ह्यात काल पुन्हा भूकंपाचा धक्का बसला. पहाटे ४ वाजून ५८ मिनिटांनी वसमत तालुक्यातल्या खापरखेडा परिसरात भूगर्भातून आवाजासह सौम्य धक्का जाणवला. २ पूर्णांक ९ रिश्टर स्केल इतकी या भूकंपाची तीव्रता होती. यात कोणत्याही प्रकारची जीवित किंवा वित्तहानी झाली नसल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

तुळजापूर इथं श्री तुळजाभवानी देवीच्या शारदीय नवरात्र महोत्सवात काल पाचव्या माळेला ललिता पंचमी निमित्त देवीची रथ अलंकार महापूजा मांडण्यात आली. धार्मिक आख्यायिकेनुसार भगवान सूर्यनारायण यांनी त्रिलोक भ्रमणासाठी आपला रथ श्री तुळजाभवानी मातेस दिला होता. त्या परंपरेतून आजही रथ अलंकार अवतार पूजेला विशेष महत्व आहे.

****